17/2017 2016-17 ST

ISSN : 2278-9308
Impact Factor : 3.20

Shri Jagadamba Vinkar Shikshan Sanstha's

# Jagadamba Mahavidyalaya, Achalpur City

## *Aadhar Social Research and Development Training Institute, Amravati*

Jointly Organising

***One Day National Interdisciplinary Conference on***

# Contribution of National and International Thinkers to the Social and Literary Development of India

**Saturday 21st January 2017**




Scanned by TapScanner

| | | | |
|---|---|---|---|
| 61 | प्रा. डॉ. ममता इंगोले-महल्ले | भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे स्त्रियांच्या जडण-घडणीत योगदान | 208 |
| 62 | डॉ. मंदा माणिकराव नांदुरकर | डॉ. नरेंद्र दाभोळकरांचे मराठी साहित्याला योगदान | 214 |
| 63 | प्रा.डॉ.सविता मा.पवार | स्वामी विवेकानंदांच्या विचारसरणीचा मराठी साहित्यावरील परिणाम | 217 |
| 64 | प्रा. डॉ. पूनम अभ्यंकर | आदिवासी कवितेवर डॉ. आंबेडकरांच्या तत्त्वज्ञानाचा प्रभाव - एक शोध | 221 |
| 65 | श्री. माधव सोनेकर | सत्याग्रह व सविनय कायदेभंग गांधीजीचा – एक दृष्टिकोन | 225 |
| 66 | डॉ. निलीमा दवने | डॉ. पंजाबराव देशमुखांचे सामाजिक कार्य | 230 |
| 67 | सुकेशिनी संजय जोगदंड | डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे सामाजिक पुनर्निर्माणाचे तत्वज्ञान | 232 |
| 68 | कु. अपर्णा ठाकरे | श्रीचक्रधर स्वामींचे सामाजिक जडणघडणीत योगदान | 237 |
| 69 | प्रा.विजय ढेंगळे | महात्मा जोतीबा फुलेंच्या शैक्षणिक विचारांची प्रासंगिकता | 241 |
| 70 | डॉ. सुनंदा गडकर | द्रष्टे सुधारक - गो. ग. आगरकर | 243 |
| 71 | प्रा.डॉ. संतोष कुटे | डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे अर्थशास्त्रातील योगदान व त्यांच्या आर्थिक विचारांची उपयुक्तता | 245 |
| 72 | डॉ. लीना सुनील कांडलकर | भारतीय बालशिक्षणाच्या वाटचालीमध्ये बालशिक्षण तज्ज्ञांचे योगदान | 249 |
| 73 | प्रा.कल्पना एस.गोडघाटे | भारतीय विचारवंतांचे भारताच्या सामाजिक जडणघडणीत योगदान | 251 |
| 74 | सविता सु. घरजारे | स्वा.विनायक दामोदर सावरकरांचे भारताच्या राजकीय जडण–घडणीतील योगदान | 254 |
| 75 | डॉ. स्मिता वानखेडे | भारतीय व जागतिक विचारवंतांचे भारताच्या सामाजिक व साहित्यिक जडणघडणीत योगदान वं.राष्ट्रसंतांची स्त्री शिक्षणाची यथार्थदृष्टी | 258 |
| 76 | श्री . किशोर पांडुरंग कदम | भारतीय स्त्री शिक्षणाच्या चळवळीतील मानाचा तुरा ः धोंडो केशव कर्वे | 263 |
| 77 | प्रा. पी.एम.वांढरे | राष्ट्रपिता महात्मा. गांधींचे आर्थिक विचार : वर्तमान स्थिती | 268 |
| 78 | प्रितेश भानुदास पाटील | महात्मा गांधीच्या दृष्टीकोनातून आर्थिक विकासाचे प्रारुप | 275 |




Scanned by TapScanner

ISSN - 2278-9308

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे अर्थशास्त्रातील योगदान व त्यांच्या आर्थिक विचारांची उपयुक्तता

प्रा.डॉ. संतोष कुटे
अर्थशास्त्र विभाग प्रमुख, मेहकर

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे भारतीय राज्य घटनेचे शिल्पकार, दलीत बहुजनांचे केवारी, सामाजीक सुधारक म्हणून सर्व परिचीत आहेत. परंतु डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या आर्थिक विचारांच्या अंगाला मात्र आपण दूर्लक्षीत ठेवले.डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना आपण कायदे पंडीत, समाजसुधारक, भारतीय राज्य घटनेचे शिल्पकार म्हणून ओळखतो.परंतु डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे केवळ एका विषयात बंदीस्त राहणारे व्यक्तीमत्व नव्हते.डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि राज्यशास्त्र, डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि समाजकारण, डॉ.बाबासाहेब आंबेडकर आणि समानता, डॉ.बाबासाहेब आंबेडकर आणि तत्वज्ञान, डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि अर्थशास्त्र या व इतर अनेक विषयातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे योगदान अतुलनिय व चिरकालीन आहेत. आणि म्हणूनच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अर्थशास्त्रातील योगदानाची त्यांच्या आर्थिक विचारांची चर्चा करणे आवश्यक आहे. याबाबत अर्थशास्त्रातील नोबेल पारितोषीक विजेते भारतीय अर्थशास्त्रज्ञ डॉ. अमर्थ सेन यांचे खालील उद्गार हे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे अर्थशास्त्रातील महत्व विषद करतात.

"Ambedkar is my Father in Economics. He is true celebrated champion of the underprivileged. He deserves more than what he has achieved today. However he was highly controversial figure in his home country, though it was not the reality. His contribution in the field of economics in marvelous and will be remembered forever....!"

Dr. Amartya Sen

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी अर्थशास्त्रासंबंधी जे काही शोधनिबंध, प्रबंध सादर केले ते पुढील प्रमाणे म्हणजेच त्यांचे अर्थशास्त्रातील योगदान पुढीलप्रमाणे आहे.

**१. ॲडमिनिस्ट्रेशन ॲन्ड फायनान्स ऑफ द इस्ट इंडिया कंपनी :-**

हा अर्थशास्त्रातील प्रबंध १५ मे १९१५ साली एम. च्या पदवीसाठी अमेरिकेमधील कोलंबीया विद्यापिठात सादर केला. या ४२ पानांच्या लघुशोध प्रबंधामध्ये डॉ. आंबेडकरांनी १७९२ ते १८५८ या काळात ईस्ट इंडिया कंपनीच्या प्रशासन आणि वित्तनीती संबंधीच्या धोरणातील बदलांचा ऐतिहासिक आढावा घेतला. कंपनीच्या धोरणातील बदलांचा भारतीय जनतेवर कसा अन्याय झाला याचे विदारक आर्थिक विश्लेषण त्यांनी प्रस्तुत लघुशोध प्रबंधात केले. ईस्ट इंडिया कंपनीकडे भारताच्या व्यापाराचा एकाधिकार होता. परंतू ही गोष्ट ब्रिटिश राज्यकर्त्यांना आवडत नव्हती. या एकाधिकाराचा मोबदला म्हणून या ना त्या कारणांसाठी ब्रिटीश सरकार स्वतःचा फायदा करुन कंपनी सरकारला प्रशासन आणि वित्त या दोन गोष्टीत फारकत करण्यास भाग पाडले. १८३४ मध्ये ईस्ट इंडिया कंपनीचा व्यापाराचा एकाधिकार नष्ट करुन ब्रिटीश जनतेसाठी भारताशी व्यापार करण्याचा मार्ग मोकळा करण्यात आला. १८५८ मध्ये ईस्ट इंडिया कंपनी बरखास्त करुन ब्रिटिश सरकारची सत्ता भारतात प्रस्थापित करण्यात आली.

१७९२ ते १८५७ या काळात कंपनी कंपनी सरकार आणि पर्यायाने ब्रिटीश सरकारने भारतीय जनतेची पिळणूक केली. भारतीय जनतेवर विविध प्रकारचे कर लावण्यात आले होते. जमिनीवरील कर विशेष जाचक होता. शेतकरी वर्ग या करामुळे कसा भरडला गेला, याचे विवेचन डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी केले. कंपनी सरकारने मोठया प्रमाणात कर्जे घेतली होती. महसूल आणि सरकारी कर्ज या स्वरुपात उभारलेल्या पैशाचा विनियोग फारच कमी प्रमाणात जनतेच्या हितासाठी केला जायचा. १८५८ मध्ये ईस्ट इंडिया कंपनी बरखास्त केल्यानंतर कंपनी सरकारवर असलेल्या ६९३ लाख



Scanned by TapScanner

ISSN - 2278-9308

पौंड खर्चाचा बोजा भारतीय जनतेवर टाकून ब्रिटीश सरकारने भारतीय जनतेवर कसा अन्याय केला, याचे अतिशय प्रभावी विश्लेशण डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केले.

**२. द इव्हालुशन ऑफ प्रोव्हान्सील फायनान्स इन ब्रिटिश इंडिया :-**

हा प्रबंध १९१७ साली लिहून पूर्ण केला विद्यापिठाने १९२१ मध्ये प्राप्त मान्यता दिली.पि.एच.डी.मिळाली.व पुस्तरुपाने १९२५ साली प्रकाशित केला.डॉ. आंबेडकरांनी पीएच.डी. च्या पदवीककरिता "A National Dividend of India : A Historic and Analytical Study " भारताचा राष्ट्रीय नफा : एक ऐतिहासिक आणि विश्लेषणात्मक अभ्यास हा प्रबंध कोलंबिया विद्यापिठात सादर केलरा होता. त्यानंतर हाच प्रबंध १९२५ मध्ये "The Evolution of Provincial Finance in British India" या नावाने प्रकाशित करण्यात आला. प्रस्तुत ग्रंथास प्राध्यापक एडविन सेलीग्मन यांची प्रस्तावना आहे.

डॉ. आंबेडकरांनी ब्रिटिश - केंद्र सरकार आणि त्यावेळची घटक राज्ये यांच्यातील आर्थिक संबंध १८३३ ते १९२९ या प्रदीर्घ कालखंडात कसकसे विकसित झालेत त्याची ऐतिहासिक मीमांसा केली आहे. १८३३ ते १८७१ या काळात भारतीय सरकाच्या वित्त व्यवस्थेचे संपूर्ण केंद्रीकरण झाले होते खर्चाचा अर्थसंकल्प करण्याचा अधिकार राज्यांकडे होता.परंतु, त्याला लागणारा पैसा उभारण्याची जबाबदारी केंद्र सरकारचा खर्च मोठया प्रमाणात वाढला. त्यामुळे सरकारची अर्थसंकल्पीव तूट प्रचंड प्रमाणात वाढली म्हणून १८९१ मध्ये केंद्र सरकार आणि घटक राज्ये यासाठी स्वतंत्र अर्थसंकल्प करण्याची पध्दत भारतात प्रथमत:च सुरू झाली.

केंद्र आणि घटक राज्यांचा स्वतंत्र अर्थसंकल्प करण्याची पध्दत सुरू झाल्यावर सुरूवातीला उचलून दिलेल्या रकमेपुरते अंदाजपत्रक असे घटक राज्याच्या अर्थव्यवस्थेचे स्वरूप होते. १८७१ - ७२ ते १८७६ - ७७ वा सहा वर्षांच्या कालखंडात प्रचलित असलेल्या काही विशिष्ट सरकारी खात्यांच्या आर्थिक प्रशासनाची जबाबदारी घटक राज्यांवर सोपविण्यात आली. या पध्दतीत केंद्र सरकारने स्वत:च्या खर्चात बचत केली. परंतु, घटक राज्यांच्या अर्थसंकल्पावरचे दडपण वाढले.त्यांना उत्पन्न व खर्च यांच्यात मेळ साधण्यासाठी नवीन कर आकारणी करावी लागली.अर्थसंकल्पीय तूट भरून काढण्यासाठी आधीच करांच्या बोजाखाली दबून गेलेल्या रयतेवर कराचा आणखी भार टाकण्यात आला.

नेमून दिलेल्या महसुलावर आधारित अंदाजपत्रक (Bud of Assisgned Revenues) पध्दत १८७७-७८ ते १९८१-८२ या वर्षांच्या काळात राबविण्यात आली होती.त्याप्रमाणे समायोजित नियोजनाची तरतूद करण्यात आली.घटक राज्यावर सोपविलेल्या प्रत्येक महसुली साधनाच्या बाबतीत अनेक वर्षांच्या नियोजकाची रक्कम ठरवली जायची.त्यानंतर महसुलाच्या हिस्सा वाटपावर आधारित अंदाजपत्रकाची पध्दत राबविण्यात आली.ही पध्दत सर्वात यशस्वी ठरली.त्यामुळे १८८२-८३ ते १९२०-२१ अशी जवळपास ३८ वर्ष ही पध्दत चालू राहिली.नव्या पध्दतीमुळे महसुली साधनांची केंद्र सरकार आणि घटक राज्ये यांच्यात विभागणी करण्यात आली.केंद्र सरकार आणि घटक राज्ये यांनी गोळा केलेल्या महसुलाचा सुनिश्चित हिस्सा एकमेकांना द्यायचा अशी तरतूद करण्यात आली.या नव्या पध्दतीमुळे वित्तीय व्यवस्थेत लवचीकता आली.१९१९ च्या रिफार्म अॅक्टनुसार जबाबदार सरकार निर्माण करण्याच्या दृष्टीने स्वयंशासित संस्थांची पध्दशीर जोपासना निर्माण करण्याचे तत्व मान्य करण्यात आले.विधिमंडळांना सरकारवर अंकुश ठेवण्याचा अधिकार प्रथमच मिळाला, त्यातून युगांतर घडले. डॉ.आंबेडकरांच्या मते, पूर्वीच्या वित्तीय रचना सदोष किंवा कुचकामी ठरल्या गेल्या म्हणून नव्हे, तर या युगांतराचा प्रभाव एवढा दांडगा होता की पूर्वीच्या वित्तीय व्यवस्थेला नवे स्वरूप देणे ही काळाची गरज ठरली.

**३. द. प्रॉब्लेम ऑफ द रुपीज :-**

हा प्रबंध त्यांनी १९२२ मध्ये लंडन स्कूल ऑफ एकोनॉमीज मध्ये सादर केला. व पुस्तक रुपाने १९२३ साली प्रकाशित केला.हा प्रबंध डि.एस.सी. साठी सादर केला होता.त्यावेळी त्यांचे वय ३२ वर्ष होते.

१८३५ पूर्वी भारतात सुवर्ण मानक आणि रूपयाचे रौप्य मानक अशी द्विमान चलनपध्दती प्रचलित होती.१८३५ च्या कायद्यानुसार सुवर्ण मानक रद्द करून देशभर एकधातुमानावर आधारित चलन पध्दती सुरू झाली.त्यानुसार रूपयाच्या परिमाणाच्या स्वरूपात चलन पध्दतीचे एकसूत्रीकरण करण्यात आले.१८० ग्रॅम टाय वजनाचे १६५ग्राम चांदी असलेला



Scanned by TapScanner

ISSN - 2278-9308

रूपया हे एकमेव चलनच संपूर्ण देशभर प्रस्थापित करण्यात आले.त्यामुळे भारतात रौप्यमानकाची सुरूवात झाली.परंतु, ही पध्दत देशाच्या गरजा भागविण्यासाठी अपर्यास असल्याची जाणीव लवकरच होऊ लागली.त्यासाठी दोन कारणे जबाबदार होती.

१. देवाणघेवाणीसाठी चलनाचा वापर मोठया प्रमाणावर वाढला.

२. आंतरराष्ट्रीय व्यापार वाढून चलनाचा वापर वाढला.

डॉ. आंबेडकर स्पष्ट करतात की, रौप्यमानकाच्या मर्यादा स्पष्ट झाल्यानंतर देखील सुवर्णमानकाच्या जोडीने सरकारी कागदी चलनाचा चंचूप्रवेश करण्यात आला. ही बाब चलनाच्या संदर्भात अतिशय दुर्दैवी घटना होती.

**४. हिस्ट्री ऑफ इंडियन करंसी अँड बँकीग:-**

हा ग्रंथ डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी १९४७ साली लिहीला.प्रो.एडवीन कॅनेन त्यांचे मार्गदर्शक होते. रॉयल कमिशन ऑफ इंडियन करंसी अँड फायनांस हे कमिशन भारतात २७/८/१९२५ आले. या कमिशनचे अध्यक्ष एडवर्ड हिल्टन यंग हे होते त्यांचे सोबत इतर सभासद नऊजन होते. त्यामध्ये सर राजेंद्र मुखर्जी, मानेकजी बेरामजी, सर पुरुषोत्तम दास ठाकूरदास, जहांगीर कूवरजी कोयाजी हे चार भारतीय सदस्ये देखिल होते. २३/११/१९२५ रोजी दिल्ली येथे बैठक झ ाली. त्यानंतर मुंबई, कलकत्ता येथे बैठकी झाल्या हया बैठकी एकूण पन्नास झाल्या हया बैठकी मध्ये भारतीय अर्थतज्ञांना साक्षी ठेवण्यासाठी व आपले म्हणणे आपल्या योजना सांगण्यासाठी आमंत्रीत केले होते. जे भारतातील अर्थतज्ञ साक्ष देण्यासाठी बोलावले त्यांची संख्या ४६ होती.त्यामध्ये दादाभाई नौरोजी हे भारतातील सर्वात मोठे मान्यवर अर्थतज्ञ होते.त्यांची पहिली साक्ष झाली.रुपया व पौंड हयांचा विनिमय दर उरविणे हा देखिल प्रमुख मुद्दा होता.९/४ किंवा १/६ असा दर ठरवावा.हे ठरणार होते. रुपया व पौंड हयांचा संबंध कोणत्या प्रमाणात कायमचा करावा हयासाठी बाबासाहेबांनी १ सिलींग ६ पेन्सचा ठरवावा असे सूचवले तेच प्रमाण मान्य करण्यात आले. ते अजूनही तेच प्रमाण चालू आहे.त्यावेळी हिल्टन यंग साहेबांनी २१४ प्रश्न बाबासाहेबांना विचारले होते.त्यांची सविस्तर तोंडीच लेखी उत्तरे दिली.ते इंग्रजांनी प्रकाशित केली होती.

१८७३ पर्यंत भारतीय रूपया आणि ब्रिटीश पौंड यांच्यातील विनिमयाचा दर १ रूपया - १ शिलींग आणि साडे दहा पेन्स या पातळीवर होता.याचा अर्थ सोने आणि रूपये यांच्यातील विनिमय दर १ औंस सोन्यास साडे पधंरा औंस चांदी असा होता.परंतु १८७३ नंतर मात्र सोने आणि चांदी यांच्यातील विनिमयाचा दर स्थिर ठेवणे कठीण झाले.विनिमयाचा हा दर स्थिर न राहण्याची दोन कारणे डॉ.आंबेडकरांनी नमूद केलीत.

१. पहीले म्हणजे युरोपमध्ये त्यावेळी झालेले चांदीचे निमुद्रीकरण होय.

२. दुसरे सोन्याच्या तुलनेत चांदीच्या उत्पादनात आलेली प्रचंड वाढ आणि त्यातून कमी झालेली चांदीची म्हणजेच चांदीच्या चलनाची किंमत होय.

सोने आणि चांदीच्या तुलनात्मक उत्पादनाच्या आकडेवारीचा तपशीलवार आढावा घेऊन डॉ. आंबेडकरांनी असा निष्कर्ष काढला की, रूपयाच्या अवमूल्यनात चांदीचा अतिरिक्त पुरवठा जबाबदार नाही, तर जगातील प्रमुख देशांनी रौप्यमानकाचा त्याग केल्यामुळेच रूपया पौंड विनिमय दरात विसंवाद निर्माण झाला.

सोन चांदीचा विनिमय दर स्थिर ठेवणे कठीण झाल्यामुळे भारताचे प्रचंड आर्थिक नुकसान झाले.याबाबतचे सविस्तर विवेचन डॉ.आंबेडकरांनी केले.डॉ. आंबेडकर स्पष्ट करतात की, भारत हा स्वतः रौप्यमानक स्वीकारलेला परंतु सुवर्णमानक स्वीकारलेल्या देशांशी घनिष्ठपणे जखडलेला देश असल्यामुळे त्याचे आर्थिक व वित्तीय जीवन सोने आणि चांदीच्या तुलनात्मक किमतींवर अंमल गाजविणा-या आणि पर्यायाने रूपया पौंड विनिमय दराचे नियंत्रण करणा-या आंधळया श्क्तीच्या अधीन होते. या सर्व घटनांची तार्किक परिणती म्हणून पुन्हा सुवर्ण मानकाची मागणी पुढे आली. भारतासाठी भविष्यकाळाच्या दष्टीकोनातून आदर्श चलन पध्दतीकोणती ?या संदर्भात अर्थतज्ज्ञांपुढे दोन प्रमुख पर्याय होते.

१. सुवर्णमानक ज्यात सोन्याच्या नाण्यांचा वापर चलन म्हणून अभिप्रेत असतो.

२. सुवर्ण विनिमय मान ज्यात कागदी नोटांचा चलन म्हणून वापर होतो. कागदी रूपये घेऊन ठरावीक दराने सोने देण्याची सरकारकडून हमी घेतली जाते.



Scanned by TapScanner

ISSN - 2278-9308

सुप्रसिध्द अर्थशास्त्रज्ञ प्रोफेसर केन्स आणि इतर अर्थशास्त्राज्ञांनी सुवर्ण विनिमय मानकाचा पुरस्कार केला होतता.त्यांच्या मते हे परिणाम लवचीक आहे.परंतु डॉ.आंबेडकरांनी त्याला कडाडून विरोध केला.त्यांच्या मते सुवर्ण मानक हेच भारतासाठी योग्य होते.आपल्या युक्तिवादाच्या समर्थनासाठी त्यांनी ऐतिहासिक पुरावे देऊन सुवर्णमानक असताना भारतातील रूपयाच्या किमती कशा स्थिर होत्या याचे पुराव्यासहित विवेचन केले.सुवर्ण विनिमय मानक प्रचलित असताना रूपयाचे मूल्य घसरले.परिणामतः भाववाढ झाली.हे त्यांनी स्पष्ट केले.

भारतातील चलन आणि वित्ताच्या रॉयल कमिशनपुढे अर्थशास्त्रज्ञ डॉ.आंबेडकरांनी १५ डिसेंबर १९२५ ला साक्ष देताना स्पष्टपणे नमूद केले होते की.चलननिर्मिती करणा-या संस्थेच्या चलननिर्मितीच्या क्षमतेवर अंकुश असण्याची आवश्यकता आहे.अन्यथा, अनिर्बंध चलनपुरवठा आणि त्यातून भाववाढ होऊन आर्थिक स्थैर्य धोक्यात येऊ शकते.

**५. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे अर्थसंकल्प संबंधी विचार :-**

अर्थसंकल्प मांडतांना जमा व खर्च मांडवा लागतो खर्च प्रचंड प्रमाणात वाढता असतो. जमा कमी कमी होत जाते. त्याला अर्थ संकल्पीय तूट असे नाव अर्थशास्त्रात आहे. ही तूट भरुन काढण्यासाठी रिझंव्ह बँक सरकारला अधिक पत पूरवठा करते. त्यामुळे जास्तीचा पैसा उपलब्ध होतो. पैसा जास्त प्रमाणात निर्माण झाला की चलन फुगवटा निर्माण होते. त्यामुळे महागाई वाढते हे दृष्ट चक्र मोगलापासून ते इंग्रजापर्यंत चालत आले. म्हणून बाबासाहेब म्हणत की रुपयाची किंमत स्थिर राहिली पाहिजे रुपयाची किंमत स्थिर ठेवणे इंग्रजांनाही शक्य झाले नाही, आणि आताच्या भारतीय सरकारांना देखिल शक्य झाले नाही. हे आपण पाहते आहोत.८० वर्षापुर्वी लिहीले प्रबंध त्याचे एकही वाक्य अजूनही कुणालच खोलता आले नाही.त्यांच्या सिध्दांतावर साधा ओरखडा देखिल आधूनिक अर्थतज्ञांना उमटवता आला नाही.

**समारोप** :-

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी मांडलेले सिंध्दांत आपल्या एकुण २४ ग्रंथामधुन संपूर्ण जगासमोर मांडले आहेत. त्या सिंध्दांतामधील द्रष्टेपणा हा कालातील आहे. त्या सिंध्दांतावर एकही आक्षेप अजुनाही कुण्याही विद्‌वानाला घेता आला नाही.हेच त्या सिंध्दांताचे द्रष्टेपण आहे. ईस्ट ईंडिया कंपनी प्रशासन आणि अर्थनिती, ब्रिटिश भारतातील प्रांतिक वित्ताची उत्क्रांती, रुपयाचा प्रश्न उगम आणि उपाय, भारतातील लहान शेत जमीनी आणि त्यावरील उपाय या चारही प्रबंधातील बाबासाहेबांचे सिध्दांत अर्थशस्त्रा संबंधी विचार आजही अबाधित आहेत. भारताने अर्थतज्ञ प्राध्यापक जॉन मेनार्ड केन्स यांनी मांडलेले सिंध्दांत स्विकारल्यामुळे भारतात भांडवलशाही प्रबळ झाली, महागाई वाढली, गरिबांचे शोषण सुरु झले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे सिंध्दांत जर भारताने प्रा. केन्स ऐवजी जर स्विकारले असते तर भारत कर्ज न होता इतर देशांना कर्ज देणारा संपन्न देश बनला असता हा आमचा दावा भारतातील अर्थतज्ञ २०१२ -१३ मध्ये मान्य करीत आहेत.त्यामुळे अर्थतज्ञ डॉ.बाबासाहेब आंबेडकर ही त्यांची विस्मृतीत गेलेली ओळख नव्याने जगासमोर येत आहे.बाबासाहेबांच्या पुतळयाऐवजी जर बाबासाहेबांचे सिध्दांत घेवून आंबेडकरी चळवळ पुढे गेली असती तर आज त्यापेक्षा अधिक पटीने यश मिळाले असते.

**संदर्भ सुची :-**


१) The Problem of Rupees - by - Dr. B. R. Ambedkar.

२) Dr. Babasaheb Ambedkar - Dhananjay Keer.

३) आर्थिक विचारांचा इतिहास - प्रा. के.एच. ठक्कर.

४) आर्थिक विचार व विचारवंत - डॉ. बी.डी. कुलकर्णी व डॉ.एस. व्हि. ढमढेरे.

५) डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची गाजलेली भाषणे


330

Co - Ordinator IQAC
Arts & Science Mahila Mahavidyalaya
Mehkar, Dist. Buldana

Scanned by TapScanner